# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. १८० /२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अब्दुल रफिक ऊर्फ मुन्ना रफिक<br>क्वार्टर नं. ५/८२ राजे रघुजीनगर<br>नागपूर - ४४० ०२४ | - | **तक्रारदार** |
| २. | जनमाहिती अधिकारी तथा कुलसचिव<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर | - | **गैरतक्रारदार** |

**(आदेश पारित दिनांक २६/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. ०६/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०४/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कुलसिचव नागपूर विद्यापिठ तर्फे सहाय्यक कुलसचिव श्री मनीष झोडपे व अधिक्षक सौ. लाडे उपस्थित आहेत.

२. तक्रारदार यांनी दि. ०६/०७/२०१० रोजी त्यांचे अपील क्र. ६८/२०१० मधील दि. ०८/०४/२०१० च्या आदेशाचे निर्णयातील आदेश क्र. १ प्रमाणे त्यांच्या दि. १३/०२/२००९ च्या अर्जातील मुद्या क्र. १ च्या संदर्भात संबंधित विद्या शाखेतून हजेरी बुक उपलब्ध करुन दिले नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ चे कलम १८ (१) प्रमाणे तक्रार दाखल केली आहे.

३. सदर तक्रारीच्या संदर्भात आयोगाचे कार्यालयातून खुलासा दि. १३/०७/२०१० च्या पत्रान्वये मागविण्यात आला होता. खुलासा दि. २६/०७/२०१० ला प्राप्त झाला असून हजेरी पुस्तकाच्या छायांकित प्रती देण्यास्तव मा. विभागप्रमुखांना पत्र पाठविण्यात आले आहे असे कळविले आहे. व त्यापूर्वी सूध्दा दि. १५/०७/२०१० रोजी

तक्रारदार यास प्रत पाठविल्याचे कळविण्यात आले होते. आज पुन्हा खुलासा दाखल करतांना त्यामध्ये माहिती पुरविण्यात आलेली आहे. परंतू हजेरी पुस्तकाच्या प्रती मागविण्यात आले असता विभाग प्रमुखांनी हजेरी पुस्तकाच्या प्रती पुरविण्यास उपलब्ध नसल्यामुळे पुरविता येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना दि. १३/०९/२०१० च्या पत्रान्वये कळविले होते. जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा आयोगापुढे सांगितले की, हजेरी पट हा विभाग प्रमुखाकडे असतो व तक्रारदार यांनी मागितलेला हजेरी पट हा १९८६ मधील असल्यामुळे तो उपलब्ध नाही असे विभाग प्रमुखांनी कळविले. तसेही अॅडव्हॉक व्यक्तीच्या संदर्भात हजेरीपट हा उपलब्ध होवू शकत नाही. त्यामुळे तक्रारदार यांना हजेरीपट हा पुरविण्यात आलेला असून तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. गैरतक्रारदार यांचे म्हणणे खरे असल्याने सदर तक्रार खारीज करण्यात येते.

२. तक्रारकर्ता व गैरतक्रारकर्ता यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**मुख्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग मुंबई**
**कॅम्प नागपूर**

**जावक क्र.................दिनांक.................**

मा. मुख्य राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**

**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २२२ /२०१०**

१. श्री सुरेश शालिकराम दुरुगकर - **तक्रारदार**
श्रीनगर चंद्रशेखर वार्ड
ता. जि. गोंदिया

२. जनमाहिती अधिकारी तथा - **गैरतक्रारदार**
बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग
ता.जि. गोंदिया

**(आदेश पारित दिनांक २६/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. १४/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०४/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी दि. १४/०६/२०१० रोजी त्यांच्या अपील क्र. १२/२०१० मधील दि. २३/०२/२०१० च्या निर्णयातील आदेश क्र. २ प्रमाणे कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिलेली नाहीत. म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) प्रमाणे तक्रार केली आहे. तक्रारीच्या सुनावणीच्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, तक्रारदार हे उपस्थित राहण्याचे पत्र पाठवितात व त्याप्रमाणे त्यांनी दि. १०/०५/२०१० ला अर्ज करुन ठराविक दिनांक नमूद करुन त्या दिनांकास माहिती दाखविण्यात यावी असे नमूद केले. परंतु संबंधित अर्जदार हे ठराविक दिनांकास माहिती बघण्याकरिता या कार्यालयात उपस्थित झाले नाही. त्या संदर्भात राज्य माहिती आयोगाला सुध्दा दि.०७/०६/२०१०

रोजी सुचित केले होते. त्या पत्राची प्रत जोडण्यात आली आहे. मात्र तक्रारदार यांनी आयोगाकडे खोटी तक्रार दाखल केली आहे व अधिनियमाचा सर्रास दुरुपयोग ते करीत आहेत असे कार्यालयाचे अभिमत आहे.



३. तत्पूर्वी तक्रारदार यांनी अपील क्र. ९३७/०९ दि. ०९/११/२००९ अन्वये पारित आदेशाच्या अनुषंगाने दि.१४/०१/२०१० ला माहिती दाखविण्यात आली. परंतू बघितलेल्या माहितीच्या संबंधातील कोणत्याही माहितीची मागणी या कार्यालयास न करता या कार्यालयाचे अधिनस्थ कार्यरत कर्मचाऱ्यांची खोटी तक्रार आयोगाकडे दाखल केली होती. त्याबाबतचा अहवाल दि.०३/०६/२०१० च्या पत्रान्वये सादर केलेला आहे. त्या अहवालाच्या छायांकित प्रती पून:श्च जोडण्यात आल्या आहेत. श्री दुरुगकर यांचे अपील अर्जाची शहानिशा केली असता सदर अर्जात अर्जदार यांनी माहिती प्राप्त न झाल्याची तक्रार केल्याचे दिसून येत नाही. याऊलट सदर अर्जाच्या नव्व्या ओळीत त्यांनी 'त्यांचे माहिती रेकॉर्ड नुसार निदर्शनास आले आहे' असे नमूद केले आहे. श्री दुरुगकर यांना कार्यालयाने वेळोवेळी रेकॉर्ड दाखविला आहे. ही बाब त्यांच्या वरील विधानानुसार दृढ होते. अशी संपूर्ण माहिती कार्यकारी अभियंता बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग गोंदिया यांनी दि.०४/०८/२०१० च्या पत्रानुसार आयोगास कळविले आहे.

४. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, ते त्यांच्या कार्यालयात माहितीचे निरिक्षण करुन घेण्यास हजर झाले होते परंतू जनमाहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे हजर नव्हते त्यामुळे त्यांनी त्या कार्यालयात तक्रार दाखल केलेली आहे. परंतू अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीवरील तारखेचे अवलोकन केले असता ती तारीख गैरअर्जदार यांनी कळविलेली तारीख नाही, नंतर अर्जदाराने प्रत्यक्ष जावून दाखल केलेली तारीख आहे. याचाच अर्थ तक्रारदार यांनी स्वत:च कळविलेल्या तारखेच्या वेळेस ते आयेगात उपस्थित झाले नाही अशी आयोगाची खात्री आहे. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२. तक्रारकर्ता व गैरतक्रारकर्ता यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**मुख्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग मुंबई**
**कॅम्प नागपूर**

**जावक क्र.................दिनांक.................**

मा. मुख्य राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २२० /२०१०**

१. श्री प्रशांत वासुदेवराव देशमुख - **तक्रारदार**
संगम निवास हरीगंगा ऑईल मीलचे बाजूला
फरशी स्टॉप दस्तुरनगर रोड, अमरावती
ता. जि. अमरावती.

२. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक - **गैरतक्रारदार**
बॅरी. आर डी. आय. के. एन. के. डी. महाविद्यालय
बडनेरा रेल्वे ता.जि. अमरावती

**(आदेश पारित दिनांक २७/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. ०३/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०६/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. श्री एस. एस. गोडबोले हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचा तक्रार अर्ज दि. ०३/०६/२०१० रोजी त्यांचे अपील क्र. १३८४/अम/२००९ मधील दि. १५/०३/२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, आयोगाच्या निर्णयाप्रमाणे ते संबंधित जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित झाले होते. परंतू संगणकाच्या संदर्भामध्ये तपासणी करता आली नाही असा जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. गोडबोले यांनी युक्तिवाद केला. व युक्तिवाद करतांना त्यांनी आयोगापुढे सांगितले की,

संगणकाची जी हार्डडिस्क आहे त्यात जी माहिती होती ती माहिती नाहिशी झाली आहे व तसे तक्रारदार यांना सुध्दा कळविण्यात आले आहे. संगणकाला अनेकदा Format केल्यामुळे माहिती उपलब्ध नसल्याचे सांगितले. तसेच आयोगापुढे सुध्दा माहिती अधिकारी यांनी खुलासा करतांना या कार्यालयात संगणक तज्ञांसह जवळपास २



तास संगणकाचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले त्याची पोहोच पुन्हा देण्यात येत आहे. संगणक तज्ञ उपस्थित असतांना आपणाला माहिती दाखविण्यात आली आहे. असा खुलासा दिला आहे. परंतू तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, इतर माहिती संगणकात आहे परंतू जी माहिती त्यांनी मागितलेली आहे ती दिसत नाही याचा अर्थ ती माहिती नष्ट करण्यात आली आहे. त्यावर पुन्हा वकीलांनी सांगितले की, संगणकात कोणतीही माहिती कोणत्याही वेळी उपलब्ध होवू शकत नाही, जी माहिती संगणकात उपलब्ध असेल तीच उपलब्ध होवू शकते व तीच पुरविली जाते, कोणतीही माहिती पुरविली जावू शकत नाही. अर्जदार यांनी १६ अधिकाऱ्यांवर केलेल्या तक्रारी संदर्भात निर्णय दिलेला नाही असे तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले. त्या मुद्यांच्या संदर्भात तक्रारदार यांना पूर्वीच कळविण्यात आले आहे. व त्यांच्या तक्रारीत कोणतेही तथ्य नसल्यामुळे जरी शालेय समितीचा ठराव झाला होता तरी त्याबाबत काहीही कार्यवाही झाली नाही. व त्याबाबत निर्णय सुध्दा उपलब्ध झाला नाही. असे असले तरी तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, संगणकातील अर्जदारास आवश्यक असलेली माहिती संगणकातून कोणत्या तारखेस नाहीशी झाली त्याबद्यलची माहिती संगणकतज्ञांकडून उपलब्ध झाल्यास ते संयुक्तिक राहील. व अर्जदाराने केलेल्या तक्रारीच्या संदर्भात कार्यवाहीची टिपणी ही उपलब्ध करुन द्यावी. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही जशी उपलब्ध असते, ज्या स्वरुपात असते तशीच मिळते अर्जदाराच्या अपक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध करुन मिळत नाही. त्यामुळे तक्रारीच्या संदर्भातील माहिती ही पूर्वीच तक्रारदार यांना कळविण्यात आली आहे असे युक्तिवादात माहिती अधिकारी यांच्या वकीलांनी सांगितले. असे असले तरी तक्रार ही अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून अर्जदाराने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जी माहिती संगणकामध्ये उपलब्ध होती ती कोणत्या तारखेपासून संगणकामधून नाहिशी

झाली त्याबद्दलचे संगणक तज्ञांकडून प्रमाणपत्र घेवून ते तक्रारदारास विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.



२. तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या चौकशीच्या कार्यवाहीची टिपणी केली असल्यास ती उपलब्ध करुन देण्यात यावी. किंवा जो निर्णय घेतला आहे त्या निर्णयाची प्रत उपलब्ध करुन द्यावी. व निर्णय घेतला नसल्यास तसे कळविण्यात यावे.

३. तक्रारकर्ता व गैरतक्रारकर्ता यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**मुख्य राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग मुंबई**
**नागपूर कॅम्प**

**जावक क्र.................दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २१२ /२०१०**

१. श्री गिरीधर पांडूरंग वानखेडे - **तक्रारदार**
समता कॉलनी टिळकनगर
ब्रम्हपूरी ता. ब्रम्हपूरी
जि. चंद्रपूर

२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी - **गैरतक्रारदार**
नगर परिषद ता. ब्रम्हपूरी
जि. चंद्रपूर

**(आदेश पारित दिनांक २७/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. ३०/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०६/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री निरंजन मालोदे प्रभारी वरिष्ठ लिपीक हे हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे अपील क्र. १८०६/२००७ मधील २२/०७/२००८ च्या आदेशातील निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही अशी तक्रार आयोगापुढे दि. ३०/०६/२०१० रोजी केलेली आहे. परंतू तक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना संपूर्ण माहिती उपलब्ध झाली आहे असे सांगितल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यात येते.

**नागपूर**

(विलास पाटील )
**मुख्य राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग मुंबई**
**नागपूर कॅम्प**

**जावक क्र.................दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. १९८ /अम/२०१०**

१. श्री प्रियांक चंद्रशेखर देशमुख - **तक्रारदार**
स्प्रेस ऑटोमोबाईल, बडनेरा रोड,
अमरावती

२. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य - **गैरतक्रारदार**
डॉ पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय
अमरावती

**(आदेश पारित दिनांक २७/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. २२/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०६/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे प्राध्यापक श्री पी. वाय. दाभाडे हे हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी दि.२२/०६/२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने, दिलेली माहिती ही योग्य नसल्यामुळे आयोगापुढे तक्रार दाखल केलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांचेतर्फे युक्तिवाद करतांना त्यांचे सहकारी प्राध्यापक श्री दाभाडे यांनी सांगितले की, तक्रारदार यांनी मागितलेल्या माहितीशी जनमाहिती अधिकारी यांचा काहीही संबंध नाही. व त्यांनी मागितलेली माहिती ही सार्वजनिक हिताशी संबंधीत नाही. त्यानुसार माहितीचा अधिकार अधिनियमाचे कलम ८ (क) प्रमाणे माहिती नाकारलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतू तक्रारदार यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती प्राचार्य श्री अनिल जगताप यांच्या १९९०-९५ च्या कालावधीतील पगारपत्रकाची आहे. प्राचार्य श्री जगताप हे ज्या विद्यापिठाअंतर्गत सलग दहा वर्ष

अधिव्याख्याता म्हणून कार्यरत होते त्याठिकाणचे अनुभव प्रमाणपत्राची प्रत, व श्री दाभाडे यांची सत्र २००८-०९, २००९-१० या सत्रात झालेल्या प्राध्यापक पदी नियुक्ती झाल्याची प्रत, अशी माहिती मागितलेली



दिसून येते. तक्रारदार यांचा सदरच्या मागितलेल्या माहितीशी काहीही संबंध नसला तरी कोणत्याही नागरिकास कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणास माहिती मागता येते व प्राधिकरणास मागितलेल्या माहितीविषयी कोणतेही कारण विचारता येत नाही. मागितलेली माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची जरी असली तरी ती पगार पत्रकाची माहिती आहे. अनुभव प्रमाणपत्राची माहिती आहे, नियुक्ती बाबतची माहिती आहे. हे सार्वजनिक अभिलेखे असून ती माहिती कोणत्या सार्वजनिक प्राधिकरणाची माहिती आहे म्हणून सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांना त्यांच्या दि.२२/०६/२०१० च्या अर्जात मागितलेली माहिती विनामुल्य टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तक्रारकर्ता व गैरतक्रारकर्ता यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**मुख्य राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग मुंबई**
**नागपूर कॅम्प**

**जावक क्र.................दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**तक्रार क्र. २४३ /नाग/२०१०**

१. श्री दर्याव सुर्यभान मेश्राम - **तक्रारदार**
मु. पो.चिखला (माईन) तह. तुमसर,
जि. भंडारा

२. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार - **गैरतक्रारदार**
तहसिल कार्यालय
तुमसर

**(आदेश पारित दिनांक २७/१०/२०१०)**
**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. ०९/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०६/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.१५/०६/२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिली म्हणून दि. ०९/०७/२०१० रोजी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार यांनी भूमिहिन असून वय ४१ वर्षे आहे, बेरोजगार असून "आम आदमी विमा योजना" या सेवेमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच ग्रामीण भागातील भूमीहीन कुटुंब प्रमूख सदस्यांची यादी तयार करुन विमा कंपनीला पाठविण्यात आलेली आहे त्या यादीत आपले नाव समाविष्ट नाही. नवीन सदस्यांचे नाव समाविष्ट करण्याबाबत शासनाचे परिपत्रक प्राप्त झाल्यानंतर आपले नाव समाविष्ट करण्यात येईल असे तहसिलदार तुमसर यांनी तक्रारदार यांना दि. २१/०६/२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले आहे.

पुन्हा तक्रारदार यांनी समाविष्ट यादीत नाव समाविष्ट न करण्याचे कारण विचारले आहे. त्यावर माहिती अधिकारी तहसिलदार यांनी आयोगापुढे सांगितले की, कोणत्याही यादीमध्ये ग्राम पातळीवर लाभार्थ्यांचे नाव समाविष्ट



करावयाचे असले तर त्या बाबतचा सर्व्हे हा ग्रामसेवक व ग्राम सभासद हे घेतात व त्या बाबतची यादी लाभार्थी व तहसिलदार यांचेकडे पाठवितात त्यामुळे तक्रारदाराचे नाव लाभार्थ्यांमध्ये का घेण्यात आले नाही यांचे कारण सांगता येत नाही. परंतू नवीन यादीत त्यांचे नाव घेण्यात आले आहे असे आयोगापुढे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तसे असल्यास तक्रारदार यांना त्याबाबत कळविणे संयुक्तिक राहील. मात्र सदरची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यात येते.

२. तक्रारकर्ता व गैरतक्रारकर्ता यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**मुख्य राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग मुंबई**
**नागपूर कॅम्प**

**जावक क्र.................दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २२९ /नाग/२०१०**

१. श्री भगीरथ दलीरामजी नागलवाडे - **तक्रारदार**
१८ गुजराती कॉलनी गणेशपुर भंडारा
ता. जि. भंडारा

२. जनमाहिती अधिकारी - **गैरतक्रारदार**
जे. एम. पटेल महाविद्यालय भंडारा
ता. जि. भंडारा

**(आदेश पारित दिनांक २७/१०/२०१०)**
**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. ०७/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०६/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांच्या अपील क्र. ४०१/२०१० मधील दि. २०/०५/२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती विहित मुदतीत न दिल्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचेविरुध्द कार्यवाही व्हावी ही विनंती केली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे तक्रारदार यांच्या द्वितीय अपीलांवर मा. आयुक्त राज्य माहिती आयोग यांनी दिलेल्या (अपील क्र. ४०१/२०१० दि. २०/०५/२०१०) आदेशाला आव्हान देणारी याचिका क्र. ३००९/२०१० दि. ०१ जुलै २०१० रोजी मा. उच्च न्यायालय खंडपीठ येथे दाखल केली असून तशी पूर्वसूचना दि. ०१/०७/२०१०

रोजी आपले कार्यालयात दिलेली आहे. तसेच सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे तक्रारदार यांना निर्णयाप्रमाणे माहिती पुरविता येत नाही त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२. तक्रारकर्ता व गैरतक्रारकर्ता यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**मुख्य राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग मुंबई**
**नागपूर कॅम्प**

**जावक क्र.................दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. १५८ /नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुरेंद्र पुंडलिकराव रेवतकर<br>प्लॉट नं. ३४५ हनुमान मंदिर मागे,<br>आय. यु. डि. पी. काटोल जि. नागपूर | - | **तक्रारदार** |
| २. | जनमाहिती अधिकारी तथा ठाणेदार<br>पोलीस स्टेशन सिताबर्डी, नागपूर | - | **गैरतक्रारदार** |

**(आदेश पारित दिनांक २६/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. २४/११/२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०४/०३/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२/०३/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार गैरहजर आहेत. गैरतक्रारदार यांना सुनावणीची पुढील तारीख २९/०६/२०१० देण्यात आली आहे. परंतू त्यांना असा निर्णय दिला आहे की, ते दि.२९/०६/२०१० च्या सुनावणीस गैरहजर असल्याने त्यांच्या विरुध्द अरेस्ट वॉरंट का काढण्यात येवू नये याबाबत खुलासा सादर करावा. दि.२९/०६/२०१० च्या सुनावणीस तक्रारदार हजर आहेत. सदर प्रकरणी गैरअर्जदार जनमाहिती अधिकारी तथा ठाणेदार पोलीस स्टेशन सिताबर्डी नागपूर श्री प्रकाश भिकाजी जाधव हजर आहेत. तसेच तात्कालीन जनमाहिती अधिकारी तथा पोलीस निरिक्षक श्रीमती सुहासीनी मेश्राम हजर आहेत. त्यांना निर्णय दिला की, मा. न्यायालयात दाखल केलेल्या अहवालाची प्रत निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आत द्यावी. त्यानंतर तक्रारदार व गैरतक्रारदार यांना सुनावणीसाठी

दि.२६/१०/२०१० रोजीची तारीख देण्यात आली. त्याप्रमाणे तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी गैरहजर आहेत.

सदर प्रकरणी दि. १०/०६/२०१० रोजी आदेश पारीत झाले. त्या आदेशात जनमाहिती अधिकारी उपस्थित झाले नसल्याने दि. २९/०६/२०१० ला सुनावणी ठेवण्यात आली व जनमाहिती अधिकारी यांना उपस्थित



राहणेसाठी अरेस्ट वॉरंट काढला होता. त्यांना दि. २९/०६/२०१० रोजी आदेश पारित होवून ३० दिवसात माहिती द्यावी व शास्तीची वसूली ही पोलीस उपआयुक्त यांनी करावी परंतू ती वसूली झाली नसल्याने तक्रार केली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी अधिकारी यांचे नाव व पदनाम कळविण्याबाबत आयोगास पत्र दिले आहे.

२. तक्रारदार यांनी दि. २४/११/२००९ रोजी तक्रार क्र. १०८/२००९ मधील आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार केली आहे. त्याबाबतचा खुलासा आयोगाचे कार्यालयाकडून दि.१९/१२/२००९ रोजी मागविण्यात आला होता. त्याप्रमाणे गैरअर्जदार यांचा खुलासा आयोगाचे कार्यालयात दि.२९/०६/२०१० रोजी प्राप्त झाला. सदर्हु खुलासा तक्रारदार यांनी खालीलप्रमाणे दाखल केला आहे.

याबाबत स्पष्टीकरण असे की, सदरहु तक्रारदार यांनी अर्ज दाखल केले पासून सदरचे प्रकरण हाताळणारे अधिकारी व कर्मचारी हे बदलत राहिले त्यामुळे अर्जदार यांना नेमकी काय माहिती पाहिजे याबाबत संभ्रम निर्माण झाला होता.

सविनय सादर आहे की, अर्जदार यांनी सदर प्रकरणीच मातृसेवा संघ यांचेकडून मागणी केलेली माहिती ही मा. आयोगाने पुर्वी दोन वेळी नाकारुन अर्जदार यांचे अर्ज निकाली काढले आहे. सद्यस्थितीत अर्जदार यांनी दाखल केलेले न्यायालयीन प्रकरणात ब फायनल मा. न्यायालयात दाखल करण्यात येवून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच ठाणेदार सिताबर्डी, नागपूर शहर हे जनमाहिती अधिकारी नाहीत, शासनाचे निर्देशानुसार सहा. पोलीस आयुक्त सिताबर्डी हे माहिती अधिकारी असून पोलीस उपायुक्त परि. क्र.१ हे अपिलीय अधिकारी आहेत.

तक्रार क्र. १५८/०९ मध्ये सुनावणी दरम्यान मा. आयुक्तांनी माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेशीत केले होते. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याने रुपये ५०००/- शास्ती त्यांच्यावर लादण्यात आली. तक्रारदारास आपण आदेशित केल्याप्रमाणे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती देण्यात आली. शास्ती वसूली बाबत आदेश वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिलेले नसल्याने शास्ती वसूलीबाबत कार्यवाही

करता आलेली नाही. तरी आपणास नम्र विनंती आहे की, जनमाहिती अधिकारी यांच्या वसूलीचे आदेश पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र.१ यांना दिल्यास त्याबाबतची कार्यवाही होईल. वरील बाब आपणास नम्रपणे नमूद करण्यात येत असून खुलासा सादर करण्यात येत आहे.



३. सदरच्या खुलाशामध्ये कोणते जनमाहिती अधिकारी होते त्यांचे नाव व पद व त्यांचा कालावधी हे आयोगास मिळण्याकरिता विनंती केली आहे. तसेच त्या बाबतची माहिती कोणत्या अधिकाऱ्याकडून मिळावी असेही त्यात नमूद केले आहे. परंतू आयोगाकडे ज्या तक्रारी दाखल होतात किंवा जी अपीलं दाखल होतात त्यात संबंधित अधिकाऱ्यांचे नाव असतेच असे नाही. जनमाहिती अधिकारी व त्यांचे पद अशाप्रकारे अर्जदार हा अग्रेषित करित असतो. त्यामुळे मागितलेल्या माहितीच्या संबंधात त्या त्या प्राधिकरणामध्ये त्या संबंधित जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहितीचा अर्ज हा सादर करणे आवश्यक असते. व त्याचप्रमाणे तक्रारदार यांनी ज्या ठाणेदाराकडे माहितीचा अर्ज सादर केला व तो अर्ज ज्या तारखेस सादर केला असेल त्यावेळेस जे ठाणेदार तेथे कार्यरत असतील ते माहिती अधिकारी नसतील तर त्यांनी तो अर्ज माहिती उपलब्ध असणाऱ्या ठाणेदाराकडे किंवा अधिकाऱ्याकडे सादर करावा. परंतू संबंधित तक्रार किंवा माहितीचा अर्ज ज्या तारखेस दाखल केला असेल व जे अधिकारी त्यावेळी कार्यरत असतील तेच माहिती अधिकारी समजण्यात येतात व तेच जबाबदार असतात. त्यानंतर कितीही अधिकारी बदलून गेले तरी त्यावेळेचे तात्कालीन जनमाहिती अधिकारी हेच जबाबदार असतात. त्यामुळे ही जबाबदारी पोलीस खात्याची आहे. राज्य माहिती आयोगाची नाही.

४. शास्तीच्या वसूलीच्या संदर्भात तात्कालीन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन दिली नसेल तर व त्यांचेविरुध्द शास्ती लादण्यात आली नसेल तर अर्जापासून ३० दिवसाच्या कालावधीत जे माहिती अधिकारी असतात त्यांच्याविरुध्द आयोगाने शास्ती लादल्यास त्यांचे वरिष्ठ यांनी शास्तीची वसूली करणे आवश्यक आहे ही बाब सुध्दा पोलीस खात्याने ठरवायची आहे. आयोग याबाबत कोणतेही आदेश देऊ शकतात. या संबंधित अर्जदाराच्या माहितीच्या संदर्भात जे अधिकारी माहिती अधिकारी असतील किंवा ज्या अधिकाऱ्याने तो अर्ज स्विकारला असेल तर ते अधिकारी किंवा ठाणेदार हे जबाबदार आहेत. व त्यांचे जे वरिष्ठ आहेत त्यांनी ते वसूल करावयाचे आहे. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे तक्रार क्र. १९८ मधील दि. ०६/१०/२००९ च्या निर्णयाप्रमाणे १० दिवसात सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे माध्यामातून मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे चौकशी करुन मा. न्यायालयात अहवालाची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी.

तसेच शास्तीच्या वसूलीच्या संदर्भात सुध्दा माहिती उपलब्ध करुन द्यावी तसे न केल्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२. तक्रारकर्ता व गैरतक्रारकर्ता यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**मुख्य राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग मुंबई**
**नागपूर कॅम्प**

**जावक क्र.................दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**

**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २१५ /२०१०**

१. श्री पंढरीनाथ तानबाजी सहारे, - **तक्रारदार**
प्लॉट नं. ८०३ तथागत बुध्द विहाराजवळ
वैशालर नगर नागपूर - ४४००१७

२. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक - **गैरतक्रारदार**
उपधर्मदाय आयुक्त, नोंदणी कार्यालय
नागपूर

**(आदेश पारित दिनांक २६/१०/२०१०)**
**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. १६/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०४/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांच्या अपील क्र. ११८/२०१० मधील दि. २३/०३/२०१० च्या निर्णयातील आदेश क्र.१ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. तक्रारीचा खुलासा दि. २१/०७/२०१० रोजी आयोगाचे कार्यालयातून मागविण्यात आला होता व तो दि. १०/०८/२०१० रोजी आयोगास प्राप्त झाला.

३. सदर खुलाशामध्ये संस्थेचे पदाधिकारी श्री बी. पी. चंद्रीकापूरे यांना कार्यालयाचे दि. १५/०५/२०१० च्या पत्रान्वये माहिती मागविण्यात आली. व त्यात मागील एक वर्षाच्या काळात तथागत बुध्द विहार संघाची नवीन

कार्यकारी मंडळाची निवडणूक घेण्यात आली आणि दि. १२/०७/२००९ ला मी माझा संपूर्ण चार्ज नविन कार्यकारी मंडळास सुपूर्द केला सध्या मी तथागत विहार संघाचा कोणत्याच पदाचा पदाधिकारी नाही. म्हणून माझ्याकडे आपण मागितलेला कोणताच रेकॉर्ड उपलब्ध नाही . त्यामुळे श्री सहारे यांना माहिती पुरविता आली नाही. तसेच मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांची याचिका क्रमांक ५२२७/०९ आदेश दिनांक २८ जानेवारी २०१० चे

..२..

आदेशान्वये विश्वस्तावर माहिती मागवून देण्याची जबरदस्ती करता येत नाही तरीसुध्दा विश्वस्तांकडून माहिती मागविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात आला आहे असा खुलासा माहिती अधिकारी, सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालय नागपूर यांनी केला आहे. तरीसुध्दा १८६/२००० व ११२२/०९ या प्रकरणातील कोणत्या कागदपत्राच्या प्रती श्री सहारे यांना पाहिजे आहे हे त्यांनी दाखवून दिल्यास पुरविता येतील.अशी त्यांनी तयारी दाखविली आहे.

विद्यमान जनमाहिती अधिकारी हे नुकतेच बदलून आले आहेत व त्यांनी सुध्दा तक्रारदार यांचेसंबंधित संपूर्ण आदेशाचे अवलोकन करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती त्यांना उपलब्ध करुन देता येतील असे आयोगापुढे सांगितले. त्यामुळे सदरची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचेकडे लेखी कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ कळवून उपस्थित राहून अभिलेखांचे निरिक्षण करावे. व त्यातून त्यांना अपेक्षित असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्यात.

२. तक्रारकर्ता व गैरतक्रारकर्ता यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**मुख्य राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग मुंबई**
**नागपूर कॅम्प**

**जावक क्र.................दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २३८ /२०१०**

१. श्री रामदास खंडुजी जाधव - **तक्रारदार**
सहकारी बँक कॉलनी, भाग-२,
सिरसो, दर्यापूर रोड, ता. मुर्तीजापूर
जि. अकोला

२. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार - **गैरतक्रारदार**
मुर्तीजापूर जि. अकोला

**(आदेश पारित दिनांक २६/१०/२०१०)**
**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. २६/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०४/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे अव्वल कारकुन श्री एम. डी. देशमुख हे प्राधिकार पत्र घेवून हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी दि. २६/०४/२०१० रोजी त्यांच्या अपील क्र. १३८८/अम/२००९ मधील दि.१०/०३/२०१० च्या निर्णयातील आदेश क्र. १ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार केली आहे. सदर तक्रारीचा खुलासा हा दि. ०२/०८/२०१० रोजी आयोगाचे कार्यालयातून मागविण्यात आला होता. सदर खुलासा दि.२१.०८.२०१० च्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे तो खालीलप्रमाणे आहे.

१) श्री रामदास खंडूजी जाधव रा. सिरसो यांना राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये अपील क्र. १३८८/अम/२००९ मधील दिनांक १०.०३.२०१० अन्वये दिनांक २०.०४.२०१० रोजी माहिती देण्यात आली आहे. अर्जदार यांना देण्यात आलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती सोबत जोडल्या आहेत.

..२..

२) अर्जदाराचे अर्जातील मुद्या क्र.१ नुसार अर्जदार यांना दि. १६.०१.२००९ नुसार माहिती देण्यात आली आहे.

३) मुद्दा क्र. २ नुसार असा खुलासा करण्यात येतो की, मा. आयुक्त यांचे आदेश फॅक्स क्र. अका/३/भुसुधार/व.आ./कावि-२८०/०८ दिनांक २३.०९.०८ या पत्राची सत्यप्रत या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे त्यासंबंधित वि. जिल्हाधिकारी, अकोला यांचे पत्र क्र. कक्ष-१/आस्था /प्रस/कावि-२८१९/०८ दि. २२ सप्टेंबर २००८ ची प्रत अर्जदार यांना देण्यात आली.

४) मुद्दा क्र.३ अन्वये खुलासा देण्यात येतो की, कक्ष अधिकारी, महसूल विभाग मुंबई क्र. एपीटी ४५९७/प्रक्र.२४८/ई-१० दि. १०.०३.९७ या पत्राची प्रत या कार्यालयात उपलब्ध झाली नाही. वि. जिल्हाधिकारी, अकोला यांचे दि.२२ स्प्टेंबर, ०८ चे पत्रानुसार कार्यवाही करण्यात आली.

वरील खुलासा मिळाल्याचे तोंडी सांगिल्यामुळे असे दिसून येते की, तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**मुख्य राज्य माहिती आयुक्त**

**राज्य माहिती आयोग मुंबई**
**नागपूर कॅम्प**
**जावक क्र.................दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २७४ /२०१०**

१. श्री अनंत रामचंद्र दक्षिणदास -- **तक्रारदार**
५५ - अ, सोमनाथ अपार्टमेंट, खरे टाऊन
धरमपेठ नागपूर
ता. जि. नागपूर

२. जनमाहिती अधिकारी तथा -- **गैरतक्रारदार**
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, नागपूर
सहकार सदन, हिंदुस्तान कॉलनी, अमरावती रोड,
नागपूर

**(आदेश पारित दिनांक २८/१०/२०१०)**

## निर्णय

१. तक्रारदार यांनी दि. २३/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार गैरहजर आहेत. गैरतक्रारदार हजर असून कागदपत्रे दाखल केली आहेत.

२. तक्रारदार यांनी दि. २३/०७/२०१० रोजी त्यांचे अपील क्र. १५७/२०१० मधील दि.०८/०४/२०१० च्या निर्णयातील आदेश क्र. १ प्रमाणे कागदपत्रे उपलब्ध होण्याकरिता तक्रार दाखल केली होती. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, नागपूर यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले की, तक्रारदार यांना २७/०७/२०१० च्या पत्रान्वये मा. राज्य माहिती



आयोगाच्या दि. ०८/०४/२०१० आदेशाप्रमाणे मागितलेली संपूर्ण कागदपत्रे त्यांना देण्यात आलेली असून त्याची पोच दि. २९/०७/२०१० रोजी घेण्यात आली त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२. तक्रारदार व गैरतक्रार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**<u>तक्रार क्र. २१७ /२०१०</u>**

१. श्री रामचंद्र क्रिष्णाजी मारटकर -- **तक्रारदार**
अमराईवार्ड मु. पो. ता. राजुरा (मा.)
जि. चंद्रपूर ४४२९०५

२. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.) -- **गैरतक्रारदार**
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

**(आदेश पारित दिनांक २८/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. १६/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार गैरहजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने अधिक्षक श्री अशोक वनकर हे हजर असून खुलासा दाखल केला आहे.

२.	तक्रारदार यांनी दि. १६/०६/२०१० रोजी त्यांचे अपील क्र. ९४/२०१० मधील दि.१८/०३/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तक्रार दाखल केली आहे. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.) जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी सुनावणीच्यावेळी सांगितले की, तक्रारदार यांना दि. २३/०६/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती पुरविलेली असून त्याबाबत माहिती मिळाल्याची पोच त्यांनी आयोगास सादर केली आहे.



३.	तक्रारदार सुनावणीस गैरहजर असल्याने तक्रारदार यांचे म्हणणे ऐकता आले नाही. यास तक्रारदार यांना माहिती मिळाल्याची पोच सुनावणीत सादर करण्यात आली म्हणून तक्रारदार यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध झाल्याचे दिसून येते म्हणून त्यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१)	तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२)	तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २२५ /२०१०**

१. श्री हर्षकुमार प्रल्हाद निखाडे, -- **तक्रारदार**
मु. पो. ता. डॉ. राजेंद्र प्रसाद वार्ड,
वरोरा जि. चंद्रपूर ४४२९०७

२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक -- **गैरतक्रारदार**
कर्मवीर विद्यालय, चरुर (खटी), ता. वरोरा
जि. चंद्रपूर

**(आदेश पारित दिनांक २८/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. १२/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी हजर असून त्यांनी कागदपत्रे दाखल केली आहेत.

२. तक्रारदार यांनी दि. १२/०७/२०१० रोजी त्यांचे अपील क्र. ४५२/नाग/२०१० मधील दि.२६/०५/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे जून १९९३ च्या हजेरी बुकाची छायांकित प्रत जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तक्रार दाखल केली आहे.



३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री वानखेडे यांनी सुनावणीत सांगितले की, त्यांनी दि. ०१/०७/२००९ रोजी श्री वा. आ. गहुकर यांचेकडून प्रभार घेतला त्या प्रभारामध्ये जून १९९३ चे शिक्षक हजेरी रजिस्टर मिळाले नाही. तसेच त्यांनी त्यांच्या लेखी खुलाशात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

१) अपील क्र. ४५२ / नाग / १० / सु / २६.०५.१० / च्या दि.२६.५.२०१० ला झालेल्या सुनावणीनुसार जुन १९९३ च्या शिक्षक हजेरी बुकाची झेरॉक्स प्रत पुरवु न शकल्यामुळे ५००/- रुपयाची शास्ती लादण्यात आली होती. परंतू न्यायालयीन खटल्यात कागदपत्रे दाखल केली होती त्याचा शोध घेतला असता जुलै १९९० ते जुन १९९३ पासूनची शिक्षक हजेरी अजुनपर्यंत शाळेला प्राप्त झालेली नाही. त्यामुळे श्री निखाडे यांना जुन ९३ ची प्रत पुरवू शकलो नाही. श्री निखाडे यांनी जी माहिती मागितली (जुन १९९३ ची शिक्षक हजेरीची झेरॉक्स प्रत शिवाय) ती पूर्णपणे देण्यात आलेली आहे. जुलै ९० ते जून १९९३ ची शिक्षक हजेरी उपलब्ध नसल्याने जुन १९९३ ची प्रत देण्यात आलेली नाही. त्यासंबंधीचे शपथपत्र जोडलेले आहे. तसेच मुख्याध्यापकाच्या प्रभार यादीमध्ये सुध्दा जून ९३ ची शिक्षण हजेरी उपलब्ध नसल्याची नोंद आहे.

तथापी तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार ज्याअर्थी त्यांना जुलै १९९३ व ऑगस्ट १९९३ ची हजेरी पत्रकाची प्रत मिळालेली आहे त्याअर्थी जून १९९३ चे ही हजेरीपटाची प्रत जनमाहिती अधिकारी यांचेकडे असणे अपेक्षित आहे. मात्र जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे म्हणणे

असे आहे की, जून १९९३ च्या हजेरीपटाची प्रत प्रयत्न करुनही मिळाली नाही. म्हणून तक्रारदार यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे पूर्वसुचना देवून त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तऐवजांचे निरिक्षण करुन घ्यावे आणि त्या निरिक्षणात जून १९९३ चे हजेरीपट उपलब्ध असल्यास त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी विनामूल्य ते हजेरीपट उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून जनमाहिती अधिकारी यांना पूर्व सूचना देवून त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तऐवजांचे निरिक्षण करुन घ्यावे. आणि जून १९९३ च्या हजेरीपटाची प्रत उपलब्ध झाल्यास तक्रारदार यांना विनामुल्य द्यावी.

२) सदरची कार्यवाही आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून १० दिवसात करण्यात यावी.

३) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २३३ /२०१०**

१. श्री डॉ. एच. एस. कनोजे -- **तक्रारदार**
प्लॉट नं. ३७ बी, गांधी ले आऊट
जाफरनगर नागपूर - १३

२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक -- **गैरतक्रारदार**
मलिक उर्दु हायस्कूल तथा वसंत प्रकाश ज्युनिअर कॉलेज
आझाद कॉलनी ताजाबाद नागपूर

**(आदेश पारित दिनांक २८/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. १६/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी हजर असून त्यांनी कागदपत्रे दाखल केली आहेत.

२. तक्रारदार यांनी दि. १६/०७/२०१० रोजी त्यांचे अपील क्र. ६२७/२००८ मधील दि.०६/०५/२००९ च्या निर्णयातील आदेश क्र. १ प्रमाणे माहिती मिळालेली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार यांनी सुनावणीत सांगितले की, त्यांना वयाचा दाखला, अनुभवाचा दाखला व अप्रुवलबाबत पत्र, ही कागदपत्रे मिळाली आहेत. परंतू मुख्याध्यापकाने शिक्षणाधिकारी जि. प.



नागपूर यांना प्रस्तावाला मंजूरी करिता पत्र दिले त्या पत्राची (फॉरवर्डींग लेटर) प्रत मुख्याध्यापकाने दिली नाही. याबाबत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी असे नमूद केले की, मुख्याध्यापकांच्या अप्रुवलसाठी द्यावयाचे कव्हरींग लेटर तक्रारदार यांना दिले आहे. त्याशिवाय इतर कागदपत्रे उपलब्ध नाही म्हणून वरील कागदपत्रांशिवाय इतर कागदपत्रे मुख्याध्यापकांच्या अप्रुवल प्रस्तावात नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर तक्रारदारास लिहून दिले. त्यामुळे तक्रारदार यांचे समाधान झाले म्हणून तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना मा. आयोगाच्या निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**

राज्य माहिती आयोग
खंडपीठ नागपूर

जावक क्र..............दिनांक.................

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

उपसचिव
राज्य माहिती आयोग
खंडपीठ नागपूर

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २१३ /२०१०**

१. श्री शरद बळीरामजी ढगे -- **तक्रारदार**
नविन शुक्रवारी, फवारा चौक
हनुमान मंदिरसमोर नागपूर

२. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक -- **गैरतक्रारदार**
भुमि अभिलेख कार्यालय, सिव्हिल लाईन्स्
नागपूर

**(आदेश पारित दिनांक २८/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. २२/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक भुमि अभिलेख नागपूर यांचे

वतीने तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री हेमंत क्षिरसागर हे हजर असून त्यांनी कागदपत्र दाखल केली आहेत.

२. तक्रारदार यांनी दि. २२/०६/२०१० रोजी त्यांचे तक्रार क्र. ३६/२०१० मधील दि.२५/०३/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे खुल्या जागेच्या संदर्भात मोका चौकशी करण्यात आली नाही तसेच गैरअर्जदाराने या दोन घरादरम्यान आडवी भिंत बांधून आमचे घराचे भिंतीलगत गटरचे चेम्बर्स निर्माण केले त्यामुळे घराचे भिंतीला ओल निर्माण झाली आहे असे तक्रारदार यांचे म्हणणे आहे त्यामुळे त्यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.



३. गैरतक्रारदार तथा माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या अहवालात असे नमूद केले आहे की, प्रस्तुत प्रकरणात नगर भूमापन अधिकारी क्र.१ नागपूर यांनी मोका चौकशी केलेली आहे. त्या अनुषंगाने तक्रारदार यांच्या प्रकरणात नगर भूमापन क्र. २१२/१, २१२/२, २१२/३, व ४४४ दरम्यान च्या खुल्या जागेच्या संदर्भात तक्रारदार व गैरतक्रारदार यांना नगर भूमापन अधिकारी क्र.१ नागपूर यांच्या कार्यालयामार्फत रितसर नोटीसीद्वारे कळवून दि.२३/०७/२०१० रोजी मोका चौकशी करुन अहवाल सादर केला आहे. आयोगाच्या आदेशाप्रमाणे मोका चौकशी पूर्ण केल्याचे दिसून येते. तथापी तक्रारदार यांचे घराचे पश्चिमेकडील भिंतीला पाणी वापरामुळे निर्माण होणाऱ्या ओलाव्या बाबत कोणतीही कार्यवाही आयोगाच्या कार्यकक्षेत नाही. त्याबाबत तक्रारदार यांनी सक्षम प्राधिकरणाकडे भिंतीला येणाऱ्या ओलाव्याबाबत तक्रार करणे संयुक्तिक राहील. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**

खंडपीठ नागपूर

**जावक क्र..............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. १८८ /२०१०**

१. श्री दिवाकर पुरुषोत्तम सरपोतदार - **तक्रारदार**
३९, राजेंद्रनगर, पोस्ट जयताळा,
हिंगणा रोड, नागपूर -१६

२. जनमाहिती अधिकारी - **गैरतक्रारदार**
विक्रीकर आयुक्त, कार्यालय
नागपूर क्षेत्र, विक्रीकर भवन,
सिव्हील लाईन्स् नागपूर

**(आदेश पारित दिनांक २८/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. २४/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. तक्रारदार यांच्या दि. २४/०५/२०१० च्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांनी गैरतक्रारदार यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली जी माहिती मागितली होती ती प्राप्त झाली. मात्र ती माहिती विलंबाने प्राप्त झाली आहे त्यामुळे

त्यांनी याबाबत आयोगासमोर नाराजी व्यक्त केली आणि आयोगास अशी विनंती केली की, भविष्यात जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहितीच्या अधिकाराखाली अर्जाची माहिती मुदत देण्यासाठी त्यांना ताकीद देण्यात यावी. मात्र त्यांना दंडाच्या स्वरुपात शास्तीची मागणी केलेली नाही. गैरतक्रारदार यांनी सुनावणीत असे सांगितले की, तक्रारदार यांना त्यांचेकडील अर्ज दि. १५/०४/२०१० रोजी प्राप्त झाला व त्यानुसार प्रथम माहिती स्पीडपोस्टने दि.०१/०६/२०१० ला पाठविण्यात आली. माहिती विलंबाने पाठविण्याचे कारण असे की, तक्रारदाराने मागितलेली



माहिती दुसऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून दि. २९/०५/२०१० पर्यंत प्राप्त झाली त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. माहिती विलंबाने देण्यामागे कोणताही वाईट हेतू नव्हता व भविष्यात अशा प्रकारे विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल अशी हमी त्यांनी दिली आणि या संदर्भात तक्रारदार यांनी देखील संमती दिली. म्हणून तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २०४/२०१०**

१. श्री सुभाष बाबुराव विखार - **तक्रारदार**
मु, पो. कुर्झा ब्रम्हपुरी
ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपुर

२. जनमाहिती अधिकारी तथा संचालक - **गैरतक्रारदार**
शांतिवन अपंग निराधार व आदिवासी विकास शिक्षण संस्था
देसाईगंज वडसा, (हेटी) जि. गडचिरोली

३. जनमाहिती अधिकारी तथा संचालक,
मागासवर्गीय सुशिक्षीत बेकार एज्युकेशन सोसायटी
ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपुर

**(आदेश पारित दिनांक २८/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. ०३/०३/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२.	तक्रारदार यांनी दि. ०३/०३/२०१० रोजी त्यांचे अपील क्र. ७१३/२००८ व अपील क्र. ७१४/२००८ मधील दि. १६/०५/२००९ च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रार दाखल केली आहे.



३.	तक्रारदार यांनी सांगितले की, आयोगाचा आदेश विनामुल्य माहिती पुरविण्याचा असतांना देखील गैरतक्रारदार यांनी दि. २६/०७/२०१० रोजी पत्र पाठवून रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार) आणि तारीख नसलेले दुसरे पत्र तक्रारदार यांना पाठवून झेरॉक्स खर्च व पोस्टेज खर्च रु. ३०,०००/- भरावे म्हणजे माहिती पुरविता येईल. तक्रारदार यांनी ते स्वतः दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती मिळावी असे नमूद केले आहे.

४.	गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी तथा सचिव शांतिवन अपंग निराधार आदिवासी विकास शिक्षण संस्था देसाईगंज जिल्हा गडचिरोली यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दि.०८/०३/२०१० च्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविलेली आहे. माहिती पाठविल्याबाबत संस्थेचे सचिव यांनी रजिस्टर पोस्टाच्या पावत्या दाखविल्या तथापी तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना रजिस्टर पोस्टाने जी माहिती मिळाली आहे त्या माहितीचे फक्त कव्हरींग लेटर मिळाले आहे. त्यासोबतची माहिती त्यात नाही. यावर जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी सांगितले की, तक्रारदार यांना रजिस्टर पोस्टाने ही माहिती पाठवितांना ९० ग्राम वजन आणि ४१५ ग्रॅम वजन असलेल्या पोस्टाच्या पावत्या दाखविल्या व सांगितले की, पोस्टाने दिलेल्या वजनाच्या पावत्यांसहित दि. ०८/०३/२०१० च्या कव्हरींग लेटर सोबत इतर संपूर्ण माहिती त्यात जोडलेली आहे. तथापी सदरची माहिती तक्रारदारास मिळालेली नाही

असे तक्रारकर्त्याचे म्हणणे आहे. म्हणून यावर तक्रारदार व गैरतक्रारदार यांच्या संमतीने असा निर्णय घेण्यात आला की, दि. ०८/०३/२०१० च्या पत्रान्वये जी माहिती पाठविलेली आहे त्या माहितीच्या झेरॉक्स प्रती विनामुल्य तक्रारदार यांना १० दिवसात व्यक्तीशः देण्यात याव्यात. त्याकरीता तक्रारदार यांचा तक्रार अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे.



## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा सचिव शांतिवन अपंग निराधार आदिवासी विकास शिक्षण संस्था (वडसा) जि. गडचिरोली यांनी तक्रारदार यांच्या दि. ०८/०३/२०१० च्या पत्रान्वये तक्रारदार यांना जी माहिती पाठविलेली आहे त्या माहितीची झेरॉक्स प्रत १० दिवसात विनामुल्य तक्रारदार यांना उपलब्ध करुन द्यावी. त्यासाठी तक्रारदार यांनी संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ घेवून व्यक्तीशः उपस्थित राहून सदरची माहिती जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांचेकडून घ्यावी आणि जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी ती माहिती तक्रारदार यांना पुरवून त्याची पोच घ्यावी.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

## तक्रार क्र. २५०/२०१०

१. श्री तरुण सी परमार - **तक्रारदार**
१८ भुपेश नगर, पोलिस लाईन टाकळी
नागपूर

२. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार - **गैरतक्रारदार**
तहसिल कार्यालय, नागपूर शहर
ता. जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक २९/१०/२०१०)**
**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. ०९/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०४/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार हजर नसल्यामुळे सुनावणी झाली नाही. म्हणून तक्रारदार व गैरतक्रारदार यांना सुनावणीची पुढील तारीख २९/१०/२०१० देण्यात आली. त्याप्रमाणे दि.२९/१०/२०१० च्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

२.	तक्रारदार यांनी दि. ०९/०४/२०१० च्या अर्जान्वये आयोगाकडील त्यांचे अपील क्र. ४७/२०१० मधील दि.०५/०३/२०१० च्या निर्णयातील आदेश क्र. १ प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द तक्रार दाखल केली आहे.

३.	सुनावणीचेवेळी तक्रारदार यांनी सागितले की, तहसिल कार्यालयात सॉलवेंसी देण्याबाबत निश्चित स्वरुपात कोणत्या प्रकारची कार्यपध्दती आहे याबाबतची माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही. त्यामुळे सॉलवंसी प्राप्त करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा



लागतो. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय नागपूर शहर श्री मते हजर आहेत व त्यांनी दि. २५/१०/२०१० च्या पत्रान्वये आयोगास खालीलप्रमाणे खुलासा सादर केला आहे.

तक्रारदार श्री तरुण परमार यांचे दिनांक ८/९/२००९ चे माहितीचे अधिकारातील अर्जाचे अनुषंगाने मा. राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांना दिनांक १५/३/२०१० रोजी आदेश पारित केला होता. सदर आदेश मिळाल्यापासून दहा दिवसाचे आत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्यास आदेश केले होते हे खरे आहे. परंतु अर्जदाराने मागितलेली माहिती ही एका विशिष्ट व्यक्तीची नसल्याने व ती पाच वर्षाचे कालावधीतील असून विस्तृत प्रमाणात असल्यामुळे अर्जदारास माहिती पुरविण्यास विलंब लागला आहे. याबाबतची माहिती या कार्यालयाचे ४/३/२०१० चे पत्रान्वये आपणास देण्यात आलेली आहे. मा. राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांचे दि. १५/३/२०१० चे आदेश या कार्यालयात दि. २२/३/२०१० रोजी प्राप्त झाले त्यानंतर अर्जदारास या कार्यालयाचे पत्र क्र. प्रस्तु/नातह/नाग (श)/कावि-१०४/२०१० दिनांक ०८/०४/२०१० अन्वये सन २००४ ते २००९ या पाच वर्षाच्या कालावधीतील हैसीयत प्रमाणपत्राची माहिती पुरविण्यात आलेली आहे. तसेच दंडाची रक्कम रुपये ५०० विहीत लेखा शिर्षाअंतर्गत चलनाद्वारे शासन जमा केलेली आहे. माहितीचे स्वरुप मोठ्या प्रमाणात असल्याने अर्जदारास माहिती पुरविण्यास थोडा विलंब झालेला आहे. परंतु जाणून बुजुन माहिती देण्यास विलंब करण्यात आलेला नाही. तसेच अर्जदारास वेळोवेळी माहिती पुरविण्यात आलेली आहे. माहितीचे

प्रमाण हे अती जास्त असल्यामुळे व कार्यालयीन जुना रेकॉर्ड सह वेगवेगळया लिपीकांकडून एकत्रीत करुन घ्यावयाची असल्यामुळे माहिती अर्जदारास पुरविण्यास थोडा विलंब झाला. याबाबत मा. माहिती आयोगाने क्षमा करावी. कृपया माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० प्रमाणे शास्ती करण्यात येऊ नये अशी आग्रहाची विनंती जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत केली.



४. जनमाहिती अधिकारी यांनी केलेल्या उपरोक्त खुलाशावरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांना सन २००४ ते २००९ या पाच वर्षाच्या कालावधीतील हैसीयत प्रमाणपत्राची माहिती पुरविण्यात आलेली आहे. मात्र तक्रारदार यांना हैसीयत प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती निश्‍चित स्वरुपात काय आहे ही माहिती मिळाली नाही असे तक्रारदार यांचे म्हणणे आहे. म्हणून तक्रारदार यांना हैसीयत प्रमाणपत्र मिळण्याची कार्यपध्दती कोणती आहे याची माहिती देणे संयुक्तिक होईल त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार नागपूर यांनी हैसियत प्रमाणपत्र देण्याची निश्‍चित कार्यपध्दती काय आहे याची माहिती तक्रारदार यांना हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावी.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर** (पी. डब्ल्यू पाटील)

**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

## तक्रार क्र. २७३/२०१०

१. श्री जी. एस. ठाकुर - **तक्रारदार**
रुझुल प्लॉट क्रमांक १४, जनता चौक, पप्पु मेडीकल स्टोअर्स जवळ,
जरीपटका नागपूर - ४४००१४

२. जनमाहिती अधिकारी तथा प्रवर्तन अधिक्षक - **गैरतक्रारदार**
प्रवर्तन विभाग म.न.पा. नागपूर

**(आदेश पारित दिनांक २९/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. ०२/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा प्रवर्तन अधिक्षक, प्रवर्तन विभाग म.न.पा. नागपूर हजर आहेत.

२.	तक्रारदार यांनी दि.०२/०८/२०१० च्या अर्जान्वये त्यांचे अपील क्र. २११/नाग/२०१० मधील दि.२५/०३/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे दि. १२/०६/२००९ च्या अर्जानुसार माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३.	तक्रारदार यांची तक्रार प्रामुख्याने जरिपटका जनता चौक येथील कमल मॅचिंग ते श्री चेलानी व श्री अभिमन्यु कुकरेजा ते सावलानी यांचे घरापर्यंत कंझरवंशी लेन मधील अतिक्रमण काढण्याच्या कार्यवाहीबाबत त्यांनी माहिती मागितली आहे.

गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी तथा प्रवर्तन अधिक्षक मनपा नागपूर यांनी त्यांचे दि.०१/१०/२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे खुलासा दाखल केला आहे. त्या खुलाशामध्ये त्यांनी असे

..२..

नमूद केले की, जरीपटका येथील कंझरवंशी लेन वरील अतिक्रमण काढण्याकरिता दि.२६/१२/२००६ रोजी संपूर्ण पथकासोबत मौक्यावर गेले असता तेथील अतिक्रमण कारकांनी कार्यवाहीला मोठ्या प्रमाणात विरोध केला. तसेच कार्यवाही थांबविण्याबाबत तेथील नागरिकांनी प्रतिनिधीत्व केले. एकंदरीत लोकांचा विरोध लक्षात घेता परिस्थिती आटोक्याबाहेर जाण्याची संभावना पाहून व पुरेसा पोलीस बंदोबस्त नसल्यामुळे कार्यवाही न करता परत यावे लागले. त्याबाबत जनमाहिती माहिती अधिकारी तथा प्रवर्तन अधिक्षक यांनी पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्रं.२, नागपूर शहर, यांना पोलीस बंदोबस्त मिळण्यासाठी दि. ०१/०६/२०१० व दि. १९/०६/२०१० रोजी स्मरणपत्र दिले आहे त्याची प्रत तक्रारदार यांना सुध्दा देण्यात आलेली आहे, तक्रारदार यांचेकडे माहिती मिळाल्याची पोच सुध्दा आहे. तथापी तक्रारदार यांना असे अपेक्षीत आहे की, या भागातील अतिक्रमण काढण्यात यावे. मात्र अतिक्रमण काढण्याबाबतची कार्यवाही आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही म्हणून तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.	तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२.	तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

नागपूर

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २६४/२०१०**

१. श्री ज्ञानेश अंबादास आत्राम - **तक्रारदार**
मु. नवेगांव पो. विरुर (स्टे) ता. राजुरा (मा)
जि. चंद्रपूर

२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक - **गैरतक्रारदार**
भारत प्राथमिक विद्यालय, नवरगांव
पो. नवरगांव ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर

**(आदेश पारित दिनांक २९/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. ०१/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी गैरहजर आहेत.

२.	तक्रारदार यांनी दि. ०१/०७/२०१० च्या अर्जान्वये त्यांचे अपील क्र. ३०३/२००९ मधील दि.०५/०८/२००९ च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे दि. २७/१२/२००८ च्या माहिती अधिकाराखाली केलेल्या अर्जातील एकूण १ ते ७ मुद्यांवर माहिती मागितली होती त्यापैकी त्यांना ४ मुद्यांची माहिती मिळालेली नाही. म्हणून त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली परंतू ती चुकीची व अपूर्ण असल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.



३.	जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक भारत प्राथमिक विद्यालय, नवरगांव ता. सिन्देवाही जि. चंद्रपूर हे गैरहजर आहेत. परंतू त्यांनी लेखी खुलासा आयोगाकडे त्यांचे दि. २१/०९/२०१० च्या पत्रान्वये सादर केला आहे. त्या खुलाशात तक्रारदाराला ज्या चार मुद्यांची माहिती मिळालेली नाही त्याबद्यल त्यांनी असे नमूद केले की, तक्रारदाराने दि.२७/१२/२००८ च्या अर्जात मुलाखत घेवून स्वाक्षरी घेण्यात आलेल्या कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. शालेय रेकॉर्डमध्ये शोधन केले असता मुलाखतीला आलेल्या उमेद्वारांची उपस्थिती नोंद व मुलाखत घेतल्याची नोंद उपलब्ध नाही त्यामुळे प्रत देता आली नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा खालीलप्रमाणे लेखी खुलासा केला आहे.

४.	(१) अर्जदाराने अनु.९ मध्ये मासिक नियोजन, वार्षिक नियोजन, टाचन बुकाच्या झेरॉक्स प्रत ....... नष्ट करण्यात आले असे कळविल्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सदर अभिलेखाचा उपयोग एक वर्षापुरताच महत्वाचा आहे. यांचा अभिलेख जतन करावयाच्या ड प्रर्वगात समावेश होतो. त्यामुळे शाळा समितिने दि. २२/११/२००८ चा ठराव क्र. ३ नुसार सदर अभिलेख निर्लेखित करण्यात आलेले आहे. सोबत ठरावाची प्रत जोडलेली आहे.

(२) सर्व्हीस बुकच्या झेरॉक्स प्रत बद्यल मुद्या प्रस्तुत केला असता जनमाहिती अधिकारी यांनी शालेय रेकॉर्डचे शोधन केले असता, संबंधित कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक तत्कालीन मख्याध्यापकांनी तयार

केल्याचे  आढळून आले नाही.  ते कार्यालयात उपलब्ध नाही त्यामुळे झेरॉक्स प्रत देता आली नाही असे नमूद केले आहे.

(३)   रजेच्या अर्जाबाबत जनमाहिती अधिकारी यांनी शिक्षक व कर्मचारी नैमीतीक रजांचे अर्ज यांचा जतन करावयाचा कालावधी अठरा महिण्यांचा आहे त्यामुळे ते निर्लेखित करण्यात आले आहे कृपया वरील ठरावाची प्रत पहावी असे खुलाशात नमूद  केले आहे.



तसेच जनमाहिती अधिकारी यांनी खुलाशात असेही नमूद केले की, त्यांचे अपील क्र.३०३/२००९ च्या दिनांक ५/८/२००९ च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दि.२०/०८/२००९ ला तक्रारकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याबाबत रजिस्टर पोस्टाने पाठविल्याचा पुरावा आयोगाकडे सादर केला आहे. तसेच तक्रारकर्ता यांनी सुध्दा सदर माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्याचे आयोगासमोर कबूल केले आहे.

तक्रारदार यांना हवी असलेली ४ मुद्यांची माहिती उपलब्ध नसल्यामुळे देता आली नाही असे लेखी दिल्याने तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.   तक्रारदार  यांची  तक्रार  खारीज करण्यात येत आहे.

२.   तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**                (पी. डब्ल्यू पाटील)

**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २३९/२०१०**

१. श्री गंगाधर गणपतराव चित्रिव - **तक्रारदार**
ह.मु. जिल्हा परिषद कॉलनी क्र. १
गणेशपुर, भंडारा, जि. भंडारा

२. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक - **गैरतक्रारदार**
(सामान्य प्रशासन विभाग) जिल्हा परिषद भंडारा
ता. जिल्हा भंडारा

**(आदेश पारित दिनांक २९/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. २१/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार गैरहजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२.   तक्रारदार हे गैरहजर असल्याने सुनावणीचे वेळी त्यांचे म्हणणे ऐकता आले नाही. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद भंडारा हे हजर असून त्यांच्या दि. १९/१०/२०१० च्या पत्रान्वये असे दिसून येते की, त्यांनी तक्रारदार यांना दि. १९/०४/२०१० च्या आयोगाच्या निर्देशानुसार जी  तीन मुद्यांची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होती ती तक्रारकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. तक्रारदार यांना माहिती प्राप्त झालेल्या पत्रावर त्यांची स्वाक्षरी सुध्दा आहे, त्यामुळे तक्रारकर्ता यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१.   तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२.   तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २९९/२०१०**

१. श्री सचिदानंद नथ्थुजी लोखंडे - **तक्रारदार**
'संघर्ष' ५८ मोहगांव (झिलपी) तहसिल हिंगणा
जिल्हा नागपूर - ४४१११०

२. जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक - **गैरतक्रारदार**
भुमी अभिलेख कार्यालय
हिंगणा जिल्हा नागपूर

**(आदेश पारित दिनांक २९/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. ०६/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भुमी अभिलेख हिंगणा गैरहजर आहेत.

२. तक्रारदार यांनी आयोगाकडील त्यांचे अपील क्र. ३१६/२०१० मधील दि. ०३/०५/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविली नाही म्हणून दि. ०६/०९/२०१० च्या अर्जान्वये आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार यांनी सुनावणीत सांगितले की, आयोगाच्या आदेशाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयातील अभिलेख्यांचे निरिक्षण केले असता त्यांना हवी असलेली माहिती विनामुल्य देण्यात यावी अशी तक्रारकर्ता यांनी विनंती केली होती. तक्रारदार हे दारिद्रय रेषेखालील असल्याचे त्यांनी नमूद केले



आहे व त्यानुसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (५) नुसार त्यांना विनामुल्य माहिती पुरविणे आवश्यक आहे असेही त्यांनी सुनावणीत स्पष्ट केले आहे. तक्रारदार हे दारिद्रय रेषेखालील असल्याचे त्यांनी खंड विकास अधिकारी पंचायत समिती हिंगणा आणि ग्राम पंचायत यांचेकडे BPL प्रमाणपत्राच्या प्रती सादर केल्यात.

४. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी यांनी दि. २०/०९/२०१० रोजी लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, तक्रारदार हे त्यांच्या राहणीमानावरुन दारिद्रय रेषेखालील दिसून येत नाही. परंतू तक्रारदार यांचेकडे बी.पी.एल. चे प्रमाणपत्र असल्यामुळे ते दारिद्रय रेषेखालील आहेत हे मान्य करणे त्यांनी दिलेल्या पुराव्यांनुसार संयुक्तिक होईल त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमि अभिलेख, भूमि अभिलेख कार्यालय हिंगणा जि. नागपूर यांनी तक्रारदार यांनी मागितलेली माहिती ते बी.पी.एल. प्रमाणपत्रधारक असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (५) प्रमाणे त्यांना हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने किंवा व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर** (पी. डब्ल्यू पाटील)

**राज्य माहिती आयुक्त**

**राज्य माहिती आयोग**

**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

निवड नस्ती **उपसचिव**

**राज्य माहिती आयोग**

**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

## <u>तक्रार क्र. २३२/२०१०</u>

१. सौ. माधुरी कृष्णा साकुळकर - **तक्रारदार**
४४, सुर्वे ले-आऊट, संजुबा हायस्कुलच्या मागे,
रघुजी नगर नागपूर - ४४००२४

२. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार - **गैरतक्रारदार**
समुद्रपूर ता. समुद्रपूर जि. वर्धा

**(आदेश पारित दिनांक ३०/१०/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. तक्रारदार यांनी दि. १६/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२.	तक्रारदार यांनी त्यांचे राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपील क्र. ९५/नाग/२०१० मधील दि.२५/०३/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३.	गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार श्री गोसावी यांनी सुनावणीचेवेळी युक्तिवाद करतांना सांगितले की, तक्रारदार यांच्या माहिती अर्जाच्या मुद्यातील माहितीच्या संबंधात महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांचेकडे अपील दाखल केले असून त्यामध्ये स्थगनादेश आहेत. जोपर्यंत त्यावर निर्णय होत नाही तोपर्यंत तक्रारदार यांच्या अर्जाच्या संदर्भात कार्यवाही करता येत नाही आणि ही वस्तुस्थिती तक्रारदार यांना दि. १०/०८/२०१० ला कळविलेली आहे. आणि सदरच्या वस्तुस्थितीचे पत्र तक्रारकर्ता यांना मिळालेले आहे, त्यामुळे त्यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.	तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२.	तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. ३२८/२०१०**

१. श्री दिनेश दांडेकर - **तक्रारदार**
द्वारा २१/१, श्री घुमडे यांचे घरी,
दत्तात्रय नगर, नागपूर -२४
नागपूर

२. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी - **गैरतक्रारदार**
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद नागपूर

**(आदेश पारित दिनांक ३०/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. २०/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०/१०/२०१० रोजी च्या

सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी तक्रार अर्जात प्रामुख्याने अशी तक्रार केली आहे की, श्री सोहन चवरे, अध्यक्ष, कास्ट्राईब जिल्हा परिषद संघटना, जिल्हा शाखा नागपूर यांनी सहाय्यक जनमाहिती अधिकारी म्हणून तक्रारदार यांच्या संबंधात संघटनेकडे कोणताही पत्र व्यवहार केला नाही अशी दिशाभूल करणारी माहिती विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी सा.प्र.वि. जिल्हा परिषद नागपूर यांना दिलेली आहे. त्यामुळे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदाराच्या संबंधात संघटनेकडे कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही असे तक्रारदार यांनी कळविले आहे. मात्र प्रत्यक्ष सहाय्यक जनमाहिती अधिकारी



श्री चवरे यांनी तक्रारदार यांच्या संदर्भात संघटनेकडे पत्र व्यवहार केलेला आहे. त्याबद्यलची माहिती तक्रारदार यांनी अन्य माहितीच्या अधिकाराच्या अर्जाखाली मिळविली व त्यासंबंधीत प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दि. ३०/१०/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा सादर केला आहे. तसेच तक्रारदार यांच्या तक्रार अर्जाचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.

१. मी माहितीचा अर्ज दिनांक ३०/०७/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी सा.प्र.वि. जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे माहिती मिळण्यासाठी सादर केला होता. (अर्जाची प्रत संलग्न)

२. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सा.प्र.वि. जिल्हा परिषद, नागपूर यांनी अर्जाचे अनुषंगाने श्री सोहन चवरे, अध्यक्ष, कास्ट्राईब जिल्हा परिषद संघटना नागपूर यांना माहिती देण्याबाबत त्यांचे पत्र क्र. जिपना/साप्रवि/स्था-३ (४)/८८८८/२०१० दिनांक २/८/२०१० अन्वये विचारणा करुन सहाय्य घेतले होते.

३.	श्री सोहन चवरे, अध्यक्ष, कास्ट्राईब जिल्हा परिषद संघटना जिल्हा शाखा, नागपूर यांनी उपरोक्त पत्राचे अनुषंगाने प्रशासनाशी पत्रव्यवहार केला नाही अशी खोटी व दिशाभूल करणारी माहिती त्यांचे पत्र क्र.८६ दिनांक ९/८/२०१० अन्वये जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सा.प्र.वि. जिल्हा परिषद नागपूर यांना दिलेली आहे. (पत्र संलग्न)

४.	परंतु प्रत्यक्षात श्री सोहन चवरे, अध्यक्ष, कास्ट्राईब जिल्हा परिषद संघटना जिल्हा शाखा, नागपूर यांनी प्रशासनाशी पत्रव्यवहार केला होता त्याबाबतची माहिती जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सा.प्र.वि. जिल्हा परिषद नागपूर यांनी मला पुरविलेली आहे. (पुरविण्यात आलेल्या माहितीच्या प्रती संलग्न) महोदय, जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सा.प्र.वि. जिल्हा परिषद नागपूर यांनी मी मागितलेली माहिती पुरविण्याकरिता श्री सोहन चवरे, अध्यक्ष, कास्ट्राईब जिल्हा परिषद संघटना जिल्हा शाखा, नागपूर यांचे सहाय्य घेतले होते. परंतू त्यांनी प्रशासनाकडे कोणताच पत्रव्यवहार केलाच नाही अशी



खोटी व दिशाभूल करणारी माहिती जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी सा.प्र.वि. जिल्हा परिषद नागपूर यांना दिलेली आहे.

५.	माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अर्जदारास पुरविण्याकरिता श्री सोहन चवरे, अध्यक्ष, कास्ट्राईब जिल्हा परिषद संघटना जिल्हा शाखा, नागपूर यांचे सहाय्य जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सा.प्र.वि. जिल्हा परिषद, नागपूर यांनी घेतले असल्यामुळे व श्री सोहन चवरे, अध्यक्ष, कास्ट्राईब जिल्हा परिषद संघटना जिल्हा शाखा, नागपूर यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सा.प्र.वि. जिल्हा परिषद नागपूर यांना सादर केली असल्यामुळे श्री सोहन चवरे, अध्यक्ष, कास्ट्राईब जिल्हा परिषद संघटना जिल्हा शाखा, नागपूर यांना माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत माहिती अधिकारी समजून त्यांचेवर रुपये २५०००/- ची शास्ती लादण्यात यावी व प्रशासनाची फसवणूक केल्याबाबत त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याचे

निर्देश त्यांचे शिस्तभंगविषयक प्राधिकारी-मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना देण्यात यावे.

वरील खुलसाशावरुन तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, सहाय्यक जनमाहिती अधिकारी श्री सोहन चवरे यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० नुसार शास्ती व शिस्तभंगाची कार्यवाही करावी असे नमूद केले आहे. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, सहाय्यक जनमाहिती अधिकारी श्री चवरे यांनी तक्रारदार यांच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दि. १८/११/२००९ आणि दि.२२/०७/२०१० अन्वये पत्रव्यवहार केलेला आहे. तसेच तक्रारदार यांना दि. ३१/०७/२०१० ला जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी सा.प्र.वि. जिल्हा परिषद नागपूर यांनी दिलेल्या खर्चाचा भरणा करण्याच्या पत्रावरुन दिसून येते. मात्र  श्री सोहन चवरे अध्यक्ष जिल्हा परिषद कास्ट्राईब संघटना जिल्हा शाखा नागपूर यांनी  ही माहिती विद्यमान जनमाहिती अधिकारी यांना दिली नाही,

..४..

त्यामुळे ते दोषी आढळून येतात. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५ (५) मधील तरतुदीनुसार जनमाहिती अधिकारी ज्या कर्मचाऱ्यांचे सहाय्य घेतात किंवा माहिती देण्यासाठी सहाय्य करीत असतात ते अधिकारी / कर्मचारी जनमाहिती अधिकारी असल्याचे समजण्यात येते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी श्री चवरे हे सहाय्यक जनमाहिती अधिकारी असून ते दोषी आढळून आल्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. त्याकरीता तक्रारदार यांचा तक्रार अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.	तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येते.

२. सहाय्यक जनमाहिती अधिकारी श्री सोहन चवरे हे प्रस्तुत प्रकरणी वर नमूद केल्याप्रमाणे दोषी आढळून येत असल्याने कलम २० (२) अन्वये त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

३. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.....................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. ३१४/२०१०**

१. श्री एस.एस.शर्मा - **तक्रारदार**
द्वारा एस.एस.तिवारी
क्वार्टर नं. २/१९/३ ओएफएजे इस्टेट
डिफेन्स नागपूर - ४४००२१

२. जनमाहिती अधिकारी - **गैरतक्रारदार**
कार्यालय, जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था सहकार सदन
हिंदुस्थान कॉलनी अमरावती रोड, नागपूर

**(आदेश पारित दिनांक ३०/१०/२०१०)**

**निर्णय**

१.	तक्रारदार यांनी दि. ०५/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२.	तक्रारदार यांनी त्यांच्या दि. ०५/०७/२०१० च्या तक्रार अर्जात हरीआंनद को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी मर्या. या सहकारी संस्थेविषयीची आवश्यक असलेली माहिती जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयाकडून प्राप्त झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर या कार्यालयातील जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक श्री पंकज वानखेडे हे सुनावणीस उपस्थित आहेत. त्यांनी सुनावणीत सांगितले की, तक्रारदार यांचा हरीआंनद को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी मर्या. या संस्थेबद्यल माहिती मिळण्याचा अर्ज उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर (१) व उपनिबंधक सहकारी संस्था (२) यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविला



असता दोनही उपनिबंधक सहकारी संस्था यांनी ही संस्था त्यांच्या कार्यक्षेत्रात येत नसल्यामुळे माहिती पुरविता येत नाही असे दि. १९/०३/२०१० व दि. ०६/०४/२०१० च्या पत्रान्वये तक्रारदार यांना कळविलेले दिसून येते. तसेच सुनावणी दरम्यान सहाय्यक निबंधक यांनी सांगितले की, तक्रारदार यांचा हरीआंनद को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी मर्या. संबंधीत तक्रार अर्ज असून ही संस्था नागपूरातील शहरी विभागात नसून ती नागपूर ग्रामिण विभाग वडधामना या गावातील संस्थेकडे असावी आणि वडधामना हे गाव नागपूर ग्रामिण तालुक्यात येते म्हणून तक्रारदार यांनी सहाय्यक निबंधक, वडधामना नागपूर तालुका यांचेकडे माहिती अधिकाराचा अर्ज केल्यास त्यांना ही माहिती उपलब्ध होवू शकेल.

३.	तक्रारदार सुनावणीचे वेळी उपस्थित असून त्यांनी सदरच्या संस्थेची माहिती मागण्यासाठी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था नागपूर तालुका यांचेकडे माहितीच्या अर्जाखाली अर्ज करण्याचे मान्य केले असल्याने त्यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर** (पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २२४/२०१०**

१. सौ नंदा सतीशराव देशपांडे - **तक्रारदार**
या.द.व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय
ति. जिल्हा अमरावती

२. जनमाहिती अधिकारी तथा क. लिपीक - **गैरतक्रारदार**
डॉ पंजाबराव देशमुख महाविद्यालय
ता. जि. अमरावती

**(आदेश पारित दिनांक ३०/१०/२०१०)**

**निर्णय**

१.	तक्रारदार यांनी दि. १२/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारकर्ती हजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे प्राध्यापक श्री पी. वाय. दाभाडे हजर आहेत.

२.	तक्रारदार यांनी दिनांक १२/०७/२०१० रोजी त्यांचे अपील क्र. १२९६/अम/२००९ मधील दि.१८/०२/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांनी मागितलेली मुद्या क्र. १ व २ ची माहिती त्यांना मिळालेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३.	गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय यांचेतर्फे प्राध्यापक पी. वाय. दाभाडे हे प्राधिकार पत्रासहित हजर असून त्यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, तक्रारदार यांनी (कर्मचाऱ्यांच्या विकल्पाबाबत) पत्राची प्रत मागितली होती. सदरचे विकल्प पत्र महाविद्यालयात उपलब्ध नसल्यामुळे ते दिसून आले नाही असे अर्जदारास कळविण्यात आले. तसेच



तक्रारदार यांना दस्तऐवज क्र.२ ज्यामध्ये ०८/१२/१९९८ चे सहाय्यक संचालक उच्च शिक्षण अमरावती यांचेकडून प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्यांची पद निश्चितीची प्रत देण्यात आली. व तक्रारदार यांनी सुध्दा ही माहिती मिळाल्याचे आयोगासमोर कबूल केले. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

## <u>आ दे श</u>

१.	तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२.	तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

नागपूर

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.....................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २७२/२०१०**

१. कु. पुष्पा पुजारामजी चांभारे - **तक्रारदार**
मु. पो. तह. गोंडपिपरी, वार्ड नं.२
जिल्हा चंद्रपूर ४४२ ७०२

२. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य - **गैरतक्रारदार**
दलितमित्र वि. तु. नागपुरे अध्यापक विद्यालय
ता. गोंडपिपरी जिल्हा चंद्रपूर

**(आदेश पारित दिनांक ३०/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. ०२/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारकर्ती हजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी हे हजर असून त्यांचे तर्फे ॲड. व्ही. ए. धवस हे सुनावणीस हजर आहेत.

२. तक्रारदार यांचे अपील क्र. २९७/२००८ मधील दि. ०५/०८/२००९ च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य दलितमित्र वि. तु. नागपुरे अध्यापक विद्यालय ता. गोंडपिपरी जिल्हा चंद्रपूर यांचे तर्फे ॲड. धवस हे उपस्थित असून त्यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, प्रस्तुत प्रकरणी शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांचेकडे सुनावणी होवून उपसंचालकांनी दि.२८/०५/२०१० रोजी निर्णय दिला असून त्या निर्णयामध्ये तक्रारदार यांना त्यांचे



दि.०१/०२/२०१० च्या अर्जातील मुद्या क्र. १ व ३ ची माहिती संस्थेशी संपर्क साधून संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याचे आदेश दिले. मुद्या क्र. १ बाबत तक्रारकर्ती यांना प्रभारी पदाच्या नियुक्तीचा आदेश पाहिजे होता मात्र तक्रारकर्ती यांना प्रभारी प्राचार्य पदाचा केवळ कार्यभार दिलेला होता परंतू स्वतंत्र नियुक्ती आदेश दिलेला नव्हता असे जनमाहिती अधिकारी यांच्या वकीलांने सांगितले. मात्र तक्रारदार यांनी प्रभारी प्राचार्य म्हणून काम केल्याच्या अनुभवाचा दाखला त्यांना देण्यात आलेला आहे. बँक ऑफ इंडिया शाखा गोंडपिपरी व दि.चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक गोंडपिपरी येथे बँक संयुक्तिक खाते उघडण्याच्या ठरावाच्या सत्यप्रती पाहिजे होत्या त्या त्यांना उपलब्ध करुन दिल्या.

वरीलप्रमाणे मुद्या क्र. १ व ३ ची माहिती तक्रारकर्ती यांना मिळाल्याचे त्यांनी कबूल केले आहे त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.....................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. १९७ /२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री इंदरसिंह परिहार,<br>१८२, हनुमान नगर, सरकारी गोडाऊनच्या समोर,<br>पुलगांव जि. वर्धा | - | **तक्रारकर्ता** |
| २. | जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य<br>सुवालाल पाटनी कॉलेज, पुलगांव<br>जि. वर्धा | - | **गैरतक्रारदार** |

**(आदेश पारित दिनांक २८/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारकदार यांनी दि. ३०/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर असून त्यांनी लेखी निवेदन दिले आहे. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी हजर असून त्यांनी कागदपत्रे व खुलासा दाखल केले आहे.

२. तक्रारदार यांनी त्यांचे आयोगाकडील अपील क्र. ५८६/२०१०, ५८७/२०१०, ५८८/२०१० व ५८९/२०१० दि. ०९/०६/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य सुवालाल पाटनी कॉलेज, पुलगांव, जि. वर्धा यांनी अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार यांनी सुनावणीत सांगितले की, आयोगाने अपीलाच्या आदेशात अपील क्र. ५८६/२०१०, ५८७/२०१०, ५८८/२०१० व ५८९/२०१० ही सर्व अपीले मान्य केली असून तक्रारदार यांना अपीलाचा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत त्यांच्या सर्व अर्जावरील माहिती विनामुल्य व्यक्तिशः छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावयाची होती असे आदेश असतांनाही जनमाहिती अधिकारी यांनी ती माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

४. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, मा. आयोगाच्या अपीलातील निर्णयाप्रमाणे तक्रारदार यांना दि. ०९/०९/२०१० च्या पत्रान्वये तक्रारदार यांच्या दि. १३/०८/२०१० च्या अपील अर्जातील दोन मुद्यांची माहिती यूपीसीने पाठविलेली आहे. सदरची माहिती यूपीसीने पाठविल्याबाबतच्या पोस्टाच्या पावत्या त्यांनी दाखविल्या त्याचप्रमाणे दि. १८/०६/२०१० पत्राने अपील क्र. ५८६/२०१० मधील निर्णयाप्रमाणे आवश्यक ती माहिती देखील तक्रारदार यांना पाठविलेली आहे. तसेच अपील क्र. ५८८/२०१० च्या आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना दि.१८/०६/२०१० रोजी यूपीसीने माहिती पाठविलेली आहे. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, तक्रारदार यांनी वर नमूद केल्याप्रमाणे सुमारे १०० पेजेसच्या माहितीची मागणी केल्याप्रमाणे यूपीसीने पाठविण्यात आलेली आहे. वरीलप्रमाणे तक्रारदार यांना माहिती पाठवून व माहिती मिळाल्यानंतर देखील मुद्याम त्रास देण्याच्या हेतूने तक्रारदार हे नेहमी आयोगाकडे तक्रार करीत असतात. त्यामुळे गैरअर्जदार यांच्या कामाचा खोळंबा होत असतो. याबाबत राज्य माहिती आयुक्त यांनी तक्रारदार यांना दि.२८/०७/२०१० च्या निर्णयात कडक सूचना दिल्या होत्या त्याचा पूरावा म्हणून दि. १८/०६/२०१० च्या निर्णयाची प्रत सुनावणीचे दिवशी दाखल केली.

५. तक्रारदार व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना दि. १८/०६/२०१० च्या पत्राने अपील क्र. ५८६/२०१०, ५८७/२०१०, ५८८/२०१० व ५८९/२०१० मधील निर्णयानुसार उपलब्ध असलेली माहिती त्यांना यूपीसी पोस्टाद्वारे पाठविलेली असून त्याची पोच सुनावणीचेवेळी सादर केली त्यामुळे तक्रारदार यांना उपलब्ध असलेली माहिती दिल्याचे दिसून येते त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.....................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**<u>तक्रार क्र. २७१ /२०१०</u>**

१. श्री ज्ञानेश्वर गो. डायगव्हाणे - **तक्रारदार**
प्लॉट नं. १०, रामकृष्ण हॉल समोर,
मंगलधाम सोसायटी, दत्तवाडी नागपूर

२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका - **गैरतक्रारदार**
स्वामी विवेकानंद हायस्कुल, वडधामना ता. हिंगणा
जिल्हा नागपूर

**(आदेश पारित दिनांक २८/१०/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. १६/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर असून त्यांनी लेखी निवेदन दिले आहे. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका गैरहजर आहेत.

२. तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे अपील क्र.७९५/२००९ दि. ०३/११/२००९ च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे दि. २३.०३.०९ च्या अर्जानुसार जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका स्वामी विवेकानंद हायस्कूल वडधामना यांना मागितलेली माहिती त्यांचेकडे उपलब्ध असूनही त्यांनी पुरविलेली नाही म्हणून तक्रारदार यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द कठोर शास्ती लावून माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जनमाहिती अधिकारी यांना पून्हा सूचना द्याव्यात अशी मागणी तक्रारदार यांनी सुनावणीचेवेळी केली आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका स्वामी विवेकानंद हायस्कुल वडधामना ता. हिंगणा जि. नागपूर ह्या उपस्थित राहिल्या नाहीत म्हणून त्यांना आयोगाचे कार्यालयातून दि. १४/०९/२०१० रोजी खुलासा मागविण्यात आला होता त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी दि.२३/०९/२०१० च्या पत्रान्वये लेखी खुलासा दाखल केला आहे. व त्यात तक्रारदार यांचे द्वितीय अपील क्र. ७९५/२००९ मध्ये दि. ०३/११/२००९ ला झालेल्या निर्णयाविरुध्द आणि दि. २९/०६/२०१० च्या निर्णयाविरुध्द याचिका दाखल करण्यात आली आहे. ती याचिका उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे असे नमूद केले आहे.

## आ दे श

१. प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचेकडे याचिका क्र. ५१३१/२०१० दाखल झाल्यामुळे सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर प्रस्तूत प्रकरणी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.....................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**<u>तक्रार क्र. ३०७ /२०१०</u>**

१. श्री गौतम बाळकृष्ण धोंगडे - **तक्रारदार**
प्लॉट नं. १४, अमर आशा सोसायटी
इंद्रप्रस्थ नगर नागपूर - २२

२. जनमाहिती अधिकारी तथा सचिव - **गैरतक्रारदार**
लोकसेवा गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या
प्लॉट नं. २७४, लोकसेवा नगर, पोस्ट प्रतापनगर, नागपूर २२

**(आदेश पारित दिनांक ३०/१०/२०१०)**
**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. ३१/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था शहर-१ यांचे प्रतिनिधी अधिक्षक श्री शैलेश कोकुलवार, हे हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे आयोगाकडील अपील क्र. ३८५/२०१० दि. १८/०५/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर शहर-१ यांनी संबंधीत सहकारी संस्थाकडून माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन न देता विलंबाने दिली व तीही अपूर्ण माहिती दिली म्हणून तक्रारदार यांनी जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द आयोगाकडे माहिती अधिकाराखाली दि.३१/०८/२०१० रोजी तक्रार दाखल केली आहे.

३. सदर तक्रारीच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा सचिव लोकसेवा गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. यांना दि. १४/०९/२०१० च्या पत्रान्वये आयोगाचे कार्यालयातून ८ दिवसात खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते. त्यानुसार जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर, (शहर-१) यांनी दि. २८/१०/२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे खुलासा सादर केला आहे. उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर-१ यांचे प्रतिनीधी अधिक्षक श्री कोकुलवार यांनी सुनावणीत सांगितले की, राज्य माहिती आयोगाने दिलेल्या आदेशाप्रमाणे सहकारी संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत संस्थेला आदेशीत केले होते. त्यानुसार जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-१ यांच्या कार्यालयात संबंधीत संस्थेकडून जी माहिती सादर करण्यात आली ती माहिती जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-१ यांनी दि.१७/०६/२०१० च्या पत्रान्वये तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू तक्रारदार यांचे म्हणणे आहे की, त्यांना जी माहिती देण्यात आली आहे ती अपूर्ण आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर शहर-१ यांनी पून्हा संबंधीत संस्थेकडून दि. ०७/०७/२०१० रोजी पत्र देवून माहिती मागितल्याचे सुनावणीत सांगितले. व त्याप्रमाणे संबंधीत संस्थेने पुन्हा माहिती सादर केली आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना कार्यालयात येवून माहिती घेवून जाण्यास सांगितले आहे. त्यानुसार तक्रारदार यांनी सदर माहिती उपनिबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयात जावून पाहिली मात्र तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, संस्थेने आता पाठविलेली माहिती ही सुध्दा पूर्वीच्याच माहिती सारखी असल्यामुळे तक्रारदार यांनी ती माहिती स्विकारली नाही.

४. वरील बाबींवरुन एकंदरीत असे दिसून येते की, तक्रारदार यांना माहिती मिळाली असून अद्यापपर्यंत त्यांना आवश्यक असलेली काही माहिती मिळणे बाकी आहे. त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर शहर-१ यांनी तक्रारदार यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन देण्यासाठी संबंधीत संस्थेला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार योग्य तो निर्देश देण्याची कार्यवाही हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात करावी.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.....................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २७६ /२०१०**

१. सौ. सरीता अं. मंगेशकर, - **तक्रारकर्ती**
जोगीनगर, घर नं. २५९५/अ,
रामेश्वरी रिंग रोड,
नागपूर - २७

२. जनमाहिती अधिकारी तथा - **गैरतक्रारदार**
नगर भुमापन अधिकारी क्र-२
नागपूर

**(आदेश पारित दिनांक ३०/१०/२०१०)**
**निर्णय**

१. तक्रारकर्ती यांनी दि. ०२/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारकर्ती हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा भुमापन अधिकारी क्र.२ नागपूर श्री पी. एन. भेंडे नगर भुमापन अधिकारी II हे हजर आहेत.

२. तक्रारकर्ती यांनी त्यांचे अपील क्र.६७३/२००९ अपील क्रमांक ६७४/२००९ दि.२५/९/२००९ च्या निर्णयातील आदेशानुसार जनमाहिती अधिकारी तथा नगर भुमापन अधिकारी क्र-२ नागपूर यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तक्रारकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे.

३.	तक्रारदार यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा भूमापन अधिकारी क्र.२ नागपूर यांनी तक्रारकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार केली असून आयोगाकडील सुनावणीचेवेळी त्यांनी सांगितले की, त्यांना प्लॉट क्र. ८९,९० मौजा बाभुळखेडा खसरा नं. ६५/२ शीट क्र. २८८/१२, मधील नगर भूमापन क्र. ६२७४ यामधील वाढीव आखिव पत्रिके बद्दलची माहिती तक्रारकर्ती यांना पाहिजे होती मात्र त्यांना ती माहिती मिळाली नाही.

४.	जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.२ नागपूर श्री भेंडे यांनी सुनावनीचेवेळी सांगितले की, मा. राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांचेकडील अपील क्र. ६७४/२००९ नुसार दि.२५/०९/०९ च्या आदेशाप्रमाणे तक्रारकर्ती यांना निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होवून आवश्यक त्या शासकीय फी चा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे आदेश होते. मात्र तक्रारकर्ती यांनी कार्यालयात येवून माहिती प्राप्त करुन घेतली नाही. त्यानंतर त्यांनी दि. २०/१०/२००९ रोजी तक्रारकर्ती यांनी रु. ४०/- शासकीय फी चा भरणा केला व त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. पून्हा तक्रारकर्ती यांनी आयोगाकडे दि.२४/११/२००९ च्या पत्रान्वये त्यांना अपेक्षित असलेली माहिती मिळण्याकरीता आयोगाकडे तक्रार केली. सदर तक्रारअर्जान्वये, दि. ०५/०४/२०१० नुसार रु. ८५/- चा भरणा करुन अपेक्षित माहिती घेवून जाणे बाबत नगर भूमापन अधिकारी क्र.२ नागपूर यांनी कळविले होते. परंतू तक्रारकर्तीने रु. ८५/- फी चा भरणाही केला नाही व माहिती घेवून जाण्यास त्यांचे कार्यालयात आल्या नाहीत असे आयोगाकडे सादर केलेल्या दि.१९/०४/२०१० च्या पत्रामध्ये दिसून येते.

५.	आयोगाच्या दि. २९/०६/२०१० च्या आदेशानुसार तक्रारदार यांना नकाशाची प्रत व आखिव पत्रिकेची प्रत दि. ११/०८/२०१० च्या पत्रानुसार रजिस्टर पोस्टाने पाठविल्याचे कळविलेले दिसून येते.

तरीसुध्दा तक्रारदार हे माहिती देवूनही वारंवार तक्रार करीत असून त्यांची तक्रार ही तांत्रीक स्वरुपाची आहे. आणि मौजे बाबुळखेडा येथील शिट नं. २८८/१९ या मिळकतीचे क्षेत्र व हद्द मा. अधिक्षक भूमि अभिलेख नागपूर यांचे दि. २४/११/२००८ च्या आदेशाप्रमाणे दुरुस्त करण्यात आले आहे. हद्द दुरुस्त करण्याची कार्यवाही तक्रारदार यांना मान्य नाही म्हणून सदर बाबतीत तक्रारदार यांना मा. अधिक्षक भूमि अभिलेख यांच्या हद्द दुरुस्तीच्या आदेशाविरुध्द अपील करणे योग्य आहे. असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

६. यावरुन असे दिसून येते की, तक्रारकर्ती यांना मौजे बाबुळखेडा येथील शिट नं. २८८/१९ या मिळकतीचे क्षेत्र व हद्द दुरुस्ती करण्याच्या अधिक्षक भूमि अभिलेख नागपूर यांचे दि. २४/११/२००८ च्या आदेशाविरुध्द सक्षम अधिकाऱ्याकडे अपील करणे संयुक्तिक व योग्य होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.....................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. २७७/२०१०**

१. श्री मुजाहिदूल हक अन्सारी व मो. हनीफ अन्सारी - **तक्रारदार**
इस्माईलपूरा, कामठी जि. नागपूर

२. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य - **गैरतक्रारदार**
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
रविनगर नागपूर

**(आदेश पारित दिनांक ३०/१०/२०१०)**
**निर्णय**

१. तक्रारकर्ता यांनी दि. ०२/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०/१०/२०१० रोजी च्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य सौ. प्रतिभा दिलीप तायडे हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे आयोगाकडील अपील क्र. ६०१/नाग/२०१० दि. ११/०६/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदार यांनी डी.टी.एड. प्रवेशासंबंधी मागणी केलेल्या माहितीविषयी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही व आयोगाकडे दाखल केलेला खुलासा सुध्दा खोटा आहे असा आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

३. सौ प्रतिभा तायडे, जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य जिल्हा शिक्षण प प्रशिक्षण संस्था रविनगर नागपूर यांनी सुनावणीत सांगितले की, आयोगाचे अपील क्र.६०१/नाग/२०१० अन्वये तक्रारदार यांचा माहिती अधिकारातील अर्ज दि. ०२/०१/२०१० ला प्राप्त झाला होता. यामध्ये तक्रारदार यांनी डी.टी.एड.

प्रवेशासंबंधी माहिती  मागितली  होती. त्यानुसार सीडीच्या स्वरुपात तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिली व ती घेवून जाण्यास सांगितले परंतू तक्रारदार हजर झाले नाही म्हणून त्यांना दि.०७/०९/२०१० ला सी.डी.च्या स्वरुपात संपूर्ण माहिती नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात आली व ती तक्रारदार यांना मिळाल्याची पोच  कार्यालयास  प्राप्त झालेली आहे असे जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था रविनगर नागपूर यांनी दि. २२/०९/२०१० च्या आयोगास सादर केलेल्या पत्रामध्ये नमूद केले आहे.

४.	तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, सी डी च्या स्वरुपातील माहिती त्यांना प्राप्त झाली आहे परंतू नागपूर विभागात उर्दु माध्यमाच्या कॉलेजात ३ टक्के प्रमाणे वि.जा.अ व माजी सैनिक या संवर्गातील किती उमेदवारांना डी.टी.एड. प्रवेश दिला आहे ती माहिती त्यांना पाहिजे आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडून तक्रारदार यांना जी सीडी उपलब्ध करुन दिली आहे त्या सीडीच्या माहितीवरुन तक्रारदार यांना नागपूर विभागात उर्दु माध्यमाच्या कॉलेजमध्ये ३ टक्के प्रमाणे डी.टी.एड  या कोर्ससाठी वि. जा. अ. आणि माजी सैनिक या संवर्गात कोणाला प्रवेश दिला आहे याची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी देणे संयुक्तिक राहील. तसेच वि.जा.अ. या संवर्गात  जे प्रवेश डी.टी.एड. या कोर्ससाठी झाले आहेत त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राच्या प्रती संबंधीत कॉलेजकडून मागवून तक्रारदार यांना १५ दिवसात देण्यात येतील असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून नागपूर विभागात उर्दु माध्यमाच्या कॉलेजमध्ये डी.टी.एड. प्रवेशासाठी विमुक्त जाती अ आणि माजी सैनिक या संवर्गात कोणाला प्रवेश दिला त्याची संपूर्ण माहिती जनमाहिती अधिकारी यांनी सीडीमध्ये उपलब्ध असलेल्या माहितीवरुन तक्रारदार यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने १५ दिवसात द्यावी. तसेच वि.जा.अ या संवर्गात ज्यांना प्रवेश दिला आहे त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्रांच्या सत्यप्रतींसंबंधीत कॉलेजकडून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसात प्राप्त करुन तक्रारदार यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावी.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.....................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**